International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 4.935
Vol.5 No.6 July-August2018

# महिला सबलीकरणात बचत गटांची भूमिका

**प्रा.शिवाजी रावसाहेब नेटके**
सहा.प्राध्यापक व राज्यशास्त्रविभाग प्रमुख
छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा.

**गोषवारा:**

भारतामध्ये एकूण लोकसंख्येच्या सरासरी ५0 टक्के महिला असतानाही त्या विकास प्रक्रियेत सक्रिय स्वरूपात नाहीत. महिला आजही चूल आणि मूल या पारंपारिक पद्धतीने ग्रामीण भागात जीवन जगत आहेत. परंतु एकविसाव्या शतकात देशात महिला बचत गटांची चळवळ विस्तारामुळे व त्यामध्ये झालेल्या प्रशंसनीय प्रगतीमुळे विकासप्रक्रियेत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून त्या महत्त्वाच्याआघाड्यावर कार्य करीत आहेत. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क प्राप्त झाले पाहिजेत त्यांच्या वरील अन्याय दूर होऊन त्यांना पुरुषांच्या बरोबरीने समाज जीवन जगण्यासाठी महिला बचत गटांची उत्तम संधी मिळाली आहे ही बाब लक्षात घेऊन प्रस्तुत शोध निबंधात महिलांच्यासबलीकरणातील महिला बचत गटांची भूमिकाअभ्यासण्याचा प्रयन्त केलाआहे.

**कळीचे शब्द:**महिला सबलीकरण, स्त्रीवाद, सामाजिक विकास, बचत गट.

## प्रस्तावना:

आपल्या वरील आर्थिक अन्याय दूर करण्यासाठी महिलांचे सामाजिक व आर्थिक सबलीकरण घडवून आणण्यासाठी महिला बचत गटांची आवश्यकता दिसून येते. बेरोजगारी, निरक्षरता, कौशल्यांचा अभाव, पारंपारिक समजुतीमुळे घराबाहेर जाऊन काम करणारयावर मर्यादा, आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव अशा अनेक अडचणींमुळे ग्रामीण व निमशहरी महिलांच्या सक्रीय सामाजिक व आर्थिक सहभागावर मर्यादा येतात भारतासारख्या विकसनशील देशात सातत्याने वाढणाऱ्या लोकसंख्येबरोबरच देशाला बेरोजगारी, दारिद्र्य व उपास मार या दुष्टचक्राचा सामना करावा लागतो. भारतामध्ये त्यातल्या त्यात महाराष्ट्रात दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांचे प्रमाण अधिक आहे. अशा या दारिद्र्यातून लोकांना बाहेर काढयासाठी व आर्थिक दुर्बल

घटकांचे आर्थिक सबलीकरण करण्यासाठी महिलांना आर्थिक स्वावलंबन करण्याचे महत्त्वाचे साधन म्हणजे महिला बचत गटाची भूमिका होय. जागतिक पातळीवर सर्वप्रथम बांगलादेशातील अर्थतज्ञ डॉ. मोहम्मद युनुस यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांची सावकारी पाशातून मुक्तता व्हावी व या लोकांना स्वयंरोजगाराचे कायमचे साधन प्राप्त व्हावे या उद्देशाने लोकांना एकत्रित करून त्यांचे छोटे छोटे गट तयार करून त्यांना लघु स्वरूपाचे व्यवसायिक कर्ज दिले. याच कार्यातून डॉ. मोहम्मद युनुस यांना बांगला देशात महिला बचत गटाची उभाणी केली. आज भारतासारख्या अनेक विकसनशील देशात मोठ्या प्रमाणात महिला बचत गट विस्तारलेला आहे. भारतातील सामाजिक चालीरीती, रूढी, परंपरामुळे महिलांना विकासाची संधी प्राप्त झाली नाही परंतु वास्तव स्वरूपात जोपर्यंत महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणले जात नाही तोपर्यंत देशाचा संपूर्ण विकास झाला असे म्हणता येणार नाही. अनुसूचित जाती-जमातींच्या महिलांची संख्या आर्थिक दुर्बल ते मध्ये अधिक असल्याने राष्ट्राच्या विकास कार्यात एक महत्त्वाची संधी प्राप्तीसाठी महिला बचत गटांना संधी प्राप्त होणार आहे

**महिला बचत गटांचा उद्देश:**

१.दारिद्र्य रेषेखालील गरीब महिलांच्या विकासासाठी १०किंवा त्यापेक्षा अधिक महिला एकत्र येऊन बचत गट स्थापन करून बचतीला प्रोत्साहन देणे व अडीअडचणींना छोटे छोटे कर्ज वाटप करणे.

२.सदस्यांनी दैनंदिन स्वरूपांत काही बचत करावी व अडचनीच्याकाळात या एकत्रित बचतीतून कर्ज घ्यायचे ही बचत गटाचीमूळ संकल्पनाआहे.

३.महिलांचे मानसिक व वैचारिक परिवर्तन घडवून आणून त्यांना स्वबळावर उभे राहण्यास आर्थिक हातभार लावणे.

४.सावकारांच्या पाशात अडकावे लागू नये,बचतीची सवय लागावी,महिलांचा सर्वांगीण विकास व्हावा हे महिला बचत गट स्थापन करण्याचा प्राथमिक हेतू होय.

**महिला बचत गटांची व्याख्या:**

आर्थिक व सामाजिक विकासाच्या दृष्टिकोनातून महिला बचत गटाची भूमिका महत्त्वाची आहे "प्रादेशिक समानता असलेल्या समविचारी, समान गरजा व समान सामाजिक व आर्थिक स्तरांमधील १०ते २०महिलांनी एकत्र बचत करून बचतीचा विनियोग उपभोगासाठी कर्ज घेऊन व्यवसाय करणाऱ्या व लोकशाही मार्गाने संघटन करणाऱ्या समूहास महिला बचत गट असे म्हणतात"

**संशोधन विधान व संशोधन प्रश्न :**

"अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा व पारनेर तालुक्यातील महिलांच्या सामाजिक व आर्थिक सबलीकरणातमहिला बचत गटाची भूमिका."

**संशोधन प्रश्न**

१. बचत गटामुळे अडीअडचणींच्या वेळेस तातडीच्या गरजा भागविण्यासाठी कर्ज वाटप कशा प्रकारे केले जाते?

२. महिला घराबाहेर पडून त्यांना नवीन बाबी शिकण्याची संधी बचत गटाद्वारे मिळाली आहे का?

३.महिलांना बचत, कर्ज घेणे व परतफेड करणे अशा आर्थिक व्यवहारांची माहिती होते का?

४.महिलांचा बचत गटअसावा? व त्यांची कार्यपद्धती कशी असावी?

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१.श्रीगोंदा व पारनेर तालुक्यातील महिलांच्या सामाजिक व आर्थिक सबलीकरणात बचत गटांचा अभ्यास करणे

२.महिला सबलीकरणतील महिला बचत गटांच्या योगदान चा सामाजिक उपकरणाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके**

१.महिला बचत गटामुळे महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी प्राप्त झालेल्या आहेत

२.महिला बचत गटामुळे गट सभासद महिलांच्या उत्पादनात वाढ झाली आहे

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत लघु संशोधनासाठी संशोधन कार्य क्षेत्रातील महिला बचत गट अध्यक्ष, सचिव व सभासदांची निवड करण्यासाठी नमुना निवडीच्या साधा यादृच्छिक नुसार निवड केली आहे श्रीगोंदा तालुक्यातील १०बचत गट व पारनेर तालुक्यातील १०बचत गटांची निवड नियमित अंकन पद्धती नुसार केली आहेएकूण५० प्रतीसादाकांचीनिवड केली आहे.

**तथ्य संकलनाचे साधने:**

**१.प्राथमिक स्रोत:**

प्रस्तुत संशोधनामध्ये प्रामुख्याने प्राथमिक स्त्रोतांवर आधारित आहे आकडेवारी व माहिती संकलित करताना महिला बचत गटांचे अध्यक्ष, सचिव वसभासद यांच्याकडून प्रश्नावली, मुलाखत व निरीक्षण या द्वारे माहिती प्राप्त केली आहे.

**२.द्वितीय स्त्रोत:**

प्रस्तुत लघु संशोधनासाठी आवश्यक असणारी द्वितीय सामग्री ही विविध संदर्भ ग्रंथ पुस्तके, जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, नाबार्डचे वार्षिक अहवाल, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अहवाल तसेच विविध विद्यापीठ पातळीवरील संशोधन, विविध संकेतस्थळे, मासिके, वर्तमानपत्रे, त्रैमासिके, बचत गटांचे मिळावे व प्रदर्शने इत्यादी द्वारे संशोधन आवश्यक ती माहिती व आकडेवारी संकलित केली आहे

**३.सांख्यिकीय विश्लेषण:**

प्रस्तुत लघु संशोधनात संकलित केलेल्या माहिती व आकडेवारीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढताना सांख्यिकीय परिणामांचा वापर केला आहे त्यासाठी सरासरी, कोष्टक, टक्केवारी इत्यादींचा वापर केला आहे.

**संकलित माहितीचे विश्लेषण:**

प्रस्तुत संशोधनामध्ये बचत गटांच्या माध्यमातून गावातील वाडी वस्तीतील महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाचा बरोबरच गटातील एकमेकांच्या अडीअडचणी शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

**तक्ता क्र.०१पारनेर व श्रीगोंदा तालुक्यातीलगावे व सभासद**

| अ.क्र. | पारनेरतालुक्यातीलगावे व सभासद | | श्रीगोंदातालुक्यातीलगावे व सभासद | | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आष्टगांव | ०२ | आनंदवाडी | ०२ | ०४ | ०८ |
| २ | बाबुर्डी | ०२ | बनपिंपरी | ०४ | ०६ | १२ |
| ३ | चिंचोली | ०३ | बोरी | ०२ | ०५ | १० |
| ४ | दरोडी | ०४ | चांडगाव | ०३ | ०७ | १४ |
| ५ | ढोकी | ०२ | चिखली | ०२ | ०४ | ०८ |
| ६ | गातेवाडी | ०२ | गव्हानेवाडी | ०२ | ०४ | ०८ |
| ७ | गोरेगांव | ०२ | घोडेगाव | ०४ | ०६ | १२ |
| ८ | कलस | ०४ | हंगेवाडी | ०२ | ०६ | १२ |
| ९ | कासारे | ०२ | काष्टी | ०२ | ०४ | ०८ |
| १० | निघोज | ०२ | कोरेगावं | ०२ | ०४ | ०८ |
| **एकूण** | | **२५** | | **२५** | **५०** | **१००** |

स्रोत:प्राथमिक माहिती संकलन

तक्ताक्र.०१नुसार पारनेरतालुकाव श्रीगोंदा तालुक्यातील दहा-दहागावांचीनिवड प्रस्तुत संशोधणासाठीकेली आहे.प्रत्येकगावातून चार, तीन आणिदोनसभासदांचीनिवड केली आहे.पारनेरतालुक्यातून २५ आणि श्रीगोंदा तालुक्यातून२५ असे एकूण ५० सभासदांची निवडकेली आहे.सर्वातजास्तपारनेरतालुक्यातील दरोडी, कलसआणिचिंचोली या गावातूनसभासदांची संख्याआहे.त्यांचीटक्केवारी १४व १२ आहे.तसेचश्रीगोंदा तालुक्यातील बनपिंपरी, घोडेगाववचांदगाव या गावातून सभासदांची संख्याआहे.त्यांचीटक्केवारी १४व १२ अशीचआहे.आष्ट्गांव, बाबुर्डी,ढोकी, गातेवाडी, गोरेगांव, कासारे वनिघोज यापारनेर तालुक्यातील प्रत्येकी दोन दोन सभासद आहेत.तसेचश्रीगोंदा तालुक्यातील आनंदवाडी, बोरी, चिखली, गव्हानेवाडी, हंगेवाडी, काष्टी वकोरेगावया गावातून प्रत्येकी दोन दोन सभासदांची निवड केली आहे

**तक्ताक्र.०२ पारनेरवश्रीगोंदा तालुक्यातील सभासदसंख्या**

| अ.क्र. | सभासद/पद | पारनेरतालुक्यातील सभासदसंख्या | श्रीगोंदातालुक्यातील सभासदसंख्या | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष | ०८ | ०७ | १५ | ३० |
| २ | सचिव | ०५ | ०८ | १३ | २६ |
| ३ | सभासद | १२ | १० | २२ | ४४ |
| | एकूण | २५ | २५ | ५० | १०० |

स्रोत:प्राथमिकमाहिती संकलनतक्ताक्र.दोननुसार पारनेरवश्रीगोंदा तालुक्यातील सभासदसंख्याचाआढावा घेण्यातआलाआहे.अध्यक्ष, सचिव वसभासद या प्रमाणे दोन्हीतालुक्यातील सारखी संख्यादर्शवली आहे.अध्यक्षसंख्या १५ असून त्यंची ३० टक्केवारी आहे. महिलाबचत गटामध्ये सचिव पदावरकार्यरतअसणारे एकूण १३ सदस्य असून त्यांची २६ टक्केवारी आहे.बचतगटा मध्येसभासद असनारेएकूण २२ सभासद असून त्यांची४४ टक्केवारी आहे.प्रस्तुतलघू संशोधनातसर्वातजास्त सभासदांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्यात्यानंतरसर्वात कमी प्रमाणात सचिव पदावर असणारे सभासदांच्या मुलाखतीघेण्यातआल्या होत्या.

**तक्ताक्र.०३ पारनेरवश्रीगोंदा तालुक्यातील शिक्षणाचास्तर दर्शविणारासभासदसंख्या**

| अ.क्र. | शिक्षण | पारनेरतालुक्यातील शिक्षण संख्या | श्रीगोंदातालुक्यातील शिक्षण संख्या | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | अशिक्षित | ०४ | ०३ | ०७ | १४ |
| २ | प्राथमिक | १० | १२ | २२ | ४४ |
| ३ | माध्यमिक | ०६ | ०४ | १० | २० |
| ४ | उच्च माध्यमिक | ०४ | ०४ | ०८ | १६ |
| ५ | पदवी | ०१ | ०२ | ०३ | ०६ |
| ६ | पदव्युत्तर | ०० | ०० | ०० | ०० |
| | एकूण | २५ | २५ | ५० | १०० |

स्रोत:प्राथमिक माहिती संकलन

तक्ताक्र.तीननुसार पारनेरवश्रीगोंदा तालुक्यातील महिलाबचत गटातील सभासदांचेशिक्षणाचा स्तराचा अभ्यास करण्यात आलेला आहे.महिलाबचत गटातील अशिक्षित सभासदांची संख्या ०७ असून त्यांची१४ टक्केवारी आहे. महिलाबचत गटातील प्राथमिकसभासदांची संख्या २२असून त्यांची४४ टक्केवारी आहे.महिलाबचत गटातील माध्यामिकसभासदांची संख्या १०असून त्यांची२०टक्केवारी आहे.महिलाबचत गटातील उच्च माध्यमिकसभासदांची संख्या ०८असून त्यांची१६टक्केवारी आहे.महिलाबचत गटातील पदवीसभासदांची संख्या ०३असून त्यांची०६टक्केवारी आहे.महिलाबचत गटातील पदव्युत्तरसभासदांची संख्या ०आहे.पारनेरवश्रीगोंदा तालुक्यातील शिक्षणाचास्तरामध्ये सर्वात जास्त प्रमाण प्राथमिक व माध्यमिक महिला बचतगटातील सभासदांचे आहे.प्रस्तुतसंशोधनात पदव्युत्तर शिक्षणघेतलेलेएकहीसभासद नव्हते.

**तक्ताक्र.०४ पारनेरवश्रीगोंदा तालुक्यातील मासिकउत्पन्नचास्तर दर्शविणारासभासदसंख्या**

| अ.क्र. | मासिकउत्पन्न | पारनेरतालुक्यातील प्रतिक्रिया | श्रीगोंदातालुक्यातील प्रतिक्रिया | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १००० पेक्षाकमी | १३ | १६ | २९ | ५८ |
| २ | १००० ते२००० | ०६ | ०४ | १० | २० |
| ३ | २०००ते ३००० | ०३ | ०२ | ०५ | १० |
| ४ | ३०००ते ४००० | ०२ | ०२ | ०४ | ०८ |
| ५ | ४००० ते५००० | ०१ | ०१ | ०२ | ०४ |
| ६ | ५००० पेक्षाजास्त | ०० | ०० | ०० | ०० |
| | एकूण | २५ | २५ | ५० | १०० |

स्रोत:प्राथमिक माहिती संकलन

तक्ताक्र.०४ पारनेरवश्रीगोंदा तालुक्यातील मासिकउत्पन्नचास्तर दर्शविणारासभासदांचाअभ्यास करण्यात आलेला आहे.पारनेरवश्रीगोंदा तालुक्यातील महिलाबचत गटामधील मासिकउत्पन्नचास्तरामध्ये १०००पेक्षा कमी उत्पन्न असणारे एकूण २९ सभासदआहेत त्यांची ५८ टक्केवारी आहे.पारनेरवश्रीगोंदा तालुक्यातील महिलाबचत गटामधील मासिकउत्पन्नचास्तरामध्ये १०००ते२००० उत्पन्न असणारे एकूण १०सभासदआहेत त्यांची २०टक्केवारी आहे.पारनेरवश्रीगोंदा तालुक्यातील महिलाबचत गटामधील मासिकउत्पन्नचास्तरामध्ये २००० ते३०००उत्पन्न असणारे एकूण ०५सभासदआहेत त्यांची १०टक्केवारी आहे.पारनेरवश्रीगोंदा तालुक्यातील महिलाबचत गटामधील मासिकउत्पन्नचास्तरामध्ये ३००० ते४०००उत्पन्न असणारे एकूण ०४सभासदआहेत त्यांची ०८टक्केवारी आहे.पारनेरवश्रीगोंदा तालुक्यातील महिलाबचत गटामधील मासिकउत्पन्नचास्तरामध्ये ४००० ते५०००उत्पन्न असणारे एकूण ०२सभासदआहेत त्यांची ०४टक्केवारी आहे.

**तक्ताक्र.०५ पारनेरवश्रीगोंदा तालुक्यातील सामाजिकउपक्रमचास्तर दर्शविणारासभासदसंख्या**

| अ.क्र. | सामाजिकउपक्रम | पारनेरतालुक्यातील प्रतिक्रिया | श्रीगोंदातालुक्यातील प्रतिक्रिया | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारूबंदीकरणे | ०२ | ०१ | ०३ | ०६ |
| २ | श्रमदानातूनरस्तेतयारकरणे | ०२ | ०२ | ०४ | ०८ |
| ३ | बससेवा सुरूकरणे | ०२ | ०२ | ०४ | ०८ |
| ४ | आरोग्यविषयक शिबीरघेणे | ०३ | ०१ | ०४ | ०८ |
| ५ | शिक्षणविषयक कामे | ०१ | ०५ | ०६ | १२ |
| ६ | बँककार्यपद्धतीचीओळख | ०२ | ०४ | ०६ | १२ |
| ७ | पोष्टिकआहार योजना | ०३ | ०२ | ०५ | १० |
| ८ | विविधव्यवसायिक प्रशिक्षण | १० | ०८ | १८ | ३६ |
| | एकूण | २५ | २५ | ५० | १०० |

स्रोत:प्राथमिक माहिती संकलन

तक्ताक्र.०५ पारनेरवश्रीगोंदा तालुक्यातील सामाजिकउपक्रमचास्तर दर्शविणारासभासदांचाअभ्यास करण्यातआलेला आहे.पारनेरवश्रीगोंदा तालुक्यातील महिलाबचत गटामधीलसामाजिकउपक्रमामध्ये दारूबंदीकरणे याउपक्रमाला प्राधान्य देणारे सभासद संख्या ०३असून त्यांची ०६ टक्केवारी आहे.महिलाबचत गटामधीलसामाजिकउपक्रमामध्ये श्रमदानातूनरस्तेतयारकरणे,बससेवा सुरूकरणेव आरोग्यविषयक शिबीरघेणे याउपक्रमाला प्राधान्य देणारे सभासद संख्यादोन्ही तालुक्यातीलप्रत्येकी०४असून त्यांची ०८टक्केवारी आहे.पारनेरवश्रीगोंदा तालुक्यातील महिलाबचत गटामधीलसामाजिकउपक्रमामध्ये शिक्षणविषयक कामेवबँककार्यपद्धतीचीओळखयाउपक्रमाला प्राधान्य देणारे सभासद संख्याप्रत्येकी०६असून त्यांची

१२टक्केवारी आहे.पारनेरवश्रीगोंदा तालुक्यातील महिलाबचत गटामधीलसामाजिकउपक्रमामध्ये पोष्टिकआहार योजनाकरणे याउपक्रमाला प्राधान्य देणारे सभासद संख्या ०५असून त्यांची १०टक्केवारी आहे.महिलाबचत गटामधीलसामाजिकउपक्रमामध्ये विविधव्यवसायिक प्रशिक्षणयाउपक्रमाला प्राधान्य देणारे सभासद संख्या १८असून त्यांची३६टक्केवारी आहे.

**निष्कर्ष:**

१.महिला बचत गटामुळे महिला धाडसी बनल्या व एकमेकांच्या सुखदु:खात सहभागीझाल्या.

२.महिला बचत गटामुळेमहिलांचेआर्थिक उत्पन्न वाढलेव परिवारालाआर्थिक मदत मिळाली.

३.महिला बचत गटाच्या माध्यमातून गाव पातळीवर विविध सामाजिकउपक्रमाला प्राधान्य मिळाले व त्यातून गावाच्या विकासाला चालना मिळाली.

४.महिला बचत गटामुळेबँकाचीकार्यपद्धती, कर्जघेणे, परतफेडकरणे अशा आर्थिक व सामाजिक व्यवहारातून महिलांचाआत्मविश्वास वाढलाआहे.

५.बचत गटाद्वारे सावकारी कर्जाच्यातुलनेत खूपच्कमी व्याजदराने आर्थिकमदत उपलब्द झालीआहे.त्यामुळेसदस्यांच्या एकमेकांच्या आर्थिकअडचणी सोडविण्यातयेऊ लागल्या.

## संदर्भ


1.Shylendra H. S., ‘Role of Self-Help Groups’, YOJANA, Vol. 52, January 2008, pp. 25.

2. Jain R., Kushawaha R., Srivastava A., ‘Socio-Economic Impact through Self Help Groups’, YOJANA, Vol. 47, No. 7, July 2003, pp. 11-12.

3.Madheswaran S. and Dharmadhikari A., ‘Empowering Rural Women through

4. Self-Help Groups: Lessons from Maharashtra Rural Credit Project’, Indian Journal of Agricultural Economics, Vol. 56, No. 3, July-September 2001, pp. 427-443.

5.Galab S. And Rao N. C., ‘Women’s Self-Help Groups, Poverty Alleviation and Empowerment’, Economic and Political Weekly,Vol. 38, No. 12/13, March 22, 2003, pp.1274-1283.

6. ठाकरे मंजुषा, भारतातीलस्वयंसहाय्यतागट;व्याप्तीव कार्यपद्धती, अर्थबोध, नोव्हेंबर-२००६.पृ.११०.

7. मुलांनीएम. यु.,२००८,महिलास्वयंसहाय्यताबचतगट, डायमंडप्रकाशन, पुणेपृ.१२.

8. देशपांडे मेधा, भारतातीलस्वयंसहाय्यतागट; पार्श्वभूमी आणिवाटचाल, अर्थसंवाद, जानेवारी-मार्च,२००६, पृ.३७०.


*प्रा.शिवाजी रावसाहेब नेटके*